महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ३६१ वा | दिनांक : १५/१२/२०२५ | वार : सोमवार

## अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांकडून घोषणांचा 'वर्षाव'



**नागपूर** : येथील हिवाळी अधिवेशन नुकतेच पार पडले असून यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घोषणांचा पाऊस पाडल्याचे दिसून आले. या अधिवेशनात शेतकऱ्यांचे अनेक मुद्दे विरोधकांनी उचलून धरले होते. परंतु, शेतकऱ्यांच्या प्रश्नावर सरकारकडून समाधानकारक उत्तर मिळाले नसल्याची टीका विरोधकांनी केली आहे. आता या अधिवेशनात मुख्यमंत्र्यांनी कोणत्या घोषणा केल्या आहेत तसेच त्यांच्या भाषणातील महत्त्वाचे मुद्दे पाहुयात.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, नवीन सरकार आल्यावर एक वर्ष झाले. आम्ही महायुतीमधील तिन्ही नेते एकत्रित निर्णय करतो. अंमलबजावणीचा प्रयत्न सातत्याने करतो. नगरपालिका निवडणुका झाल्या. महापालिका व जिल्हा परिषद होतील. अनेक वर्षे निवडणूक न झाल्याने स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये दु:ख होते. आता लोकशाही खालच्या स्तरापर्यंत पोहोचण्यास महाराष्ट्र गतीने काम करेल. मध्यंतरी महाराष्ट्राला भोगावे लागले. या सगळ्या गोष्टी विसरून जायच्या. कारण महाराष्ट्र आता थांबणार नाही. सकारात्मकतेने पुढे जायचा आमचा विचार आहे. अमृतमहोत्सवी महाराष्ट्र घडवण्यासाठी वाटचाल करायची आहे. सभागृहातील दोन्ही बाजूच्या नेत्यांना आवाहन आहे, महाराष्ट्राला पुढे नेण्याचा विचार करूयात.

### कोणतीही योजना बंद होणार नाही

पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, अनेकांनी योजनांवर शंका घेतली. निवडणूक झाली की योजना बंद करतील बोलले. कुठलीही योजना बंद होणार नाही. पाच वर्षे योजना सुरु राहतील. व्हिजन डॉक्युमेंट महाराष्ट्राच्या विकासाचे तयार केले आहे. 2030, 2035 व 2047 असे तीन टप्पे केले आहे, 2029-30 दरम्यान देशातील पहिली ट्रिलियन डॉलर इकॉनॉमी महाराष्ट्र असेल. देशात 3 राज्य आहेत. ज्यांचे दायित्व 20 टक्क्यांपेक्षा कमी आहे, त्यात, गुजरात ओरिसा व महाराष्ट्र आहे. राजकोषीय तूट ही 3 टक्क्यांच्या आत ठेवणे गरजेचे आहे. लाडकी बहीण व शेतकऱ्यांना पैसे देऊन 3 टक्क्यांपर्यंत ठेवण्यात यशस्वी ठरलो आहोत. त्यामुळे आपण दिवाळखोरीकडे चाललो नाही. देशातील इतर राज्याच्या तुलनेत राज्याने भांडवली गुंतवणूक जास्त केलेली आहे. कुठलीही तडजोड आपण केलेली नाही.

### एफडीएमध्ये महाराष्ट्र नंबर वन

महाराष्ट्रातील गुंतवणुकीविषयी बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, महाराष्ट्र हा गुंतवणुकीत पुढे चालला आहे. दावोसमध्ये आपण पाहिले की 15 लाख कोटी रुपयांचे करार होते. त्यातील 5 लाख कोटी ही विदर्भातील होती. कोकणात 2 लाख कोटी गुंतवणूक होती. 2022 ते 25 विचार केला, तर दावोस गुंतवणूक ही 17 लाख कोटींवर जाते सामंजस्य करारापैकी अंमलबजावणी झाली त्याचे प्रमाण 75 टक्के आहे. पहिल्या 2 वर्षांतील 90 टक्क्यांपर्यंत आहे. म्हणजे करार अंमलबजावणी सुरु आहे. 13 लाख 75 हजार कोटींची गुंतवणूक आहे. 7 लाख रोजगार निर्मिती होणार आहे. एफडीए मध्ये महाराष्ट्र नंबर वन आहे.

### सोलर मॉड्युलमध्ये विदर्भ हे देशात एक नंबर होईल

2025-26 मध्ये 91 हजार कोटी रुपयांची परकीय गुंतवणूक महाराष्ट्रात आली आहे. देशातील एकूण गुंतवणूक पैकी 31 गुंतवणूक फक्त महाराष्ट्रात आली आहे. विदर्भात गडचिरोली हे नवे मॅग्नेट तयार झाले आहे. सर्वाधिक गुंतवणूक ही गडचिरोलीमध्ये आली आहे. गुंतवणूक केलेल्या कंपनीतील काहींचे उत्पादन सुरु झाले आहे, त्यामुळे सोलर मॉड्युलमध्ये विदर्भ हे देशात एक नंबर होईल, अशा विश्वास देवेंद्र फडणवीसांनी व्यक्त केला.

### ईव्ही कॅपिटल म्हणून मराठवाडा तयार होतोय

स्टीलमध्ये 2 लाख कोटींची गुंतवणूक आहे. तर 1 लाख रोजगार निर्माण होईल. गोल गॅसिफिकेशनमध्ये देशातील सर्वात मोठी गुंतवणूक म्हणजे 70 हजार कोटींची गुंतवणूक विदर्भात आली आहे. ईव्ही कॅपिटल म्हणून मराठवाडा तयार होत आहे. 50 हजार कोटींची व 30 हजार रोजगार गुंतवणूक आली आहे. टोयोटा, स्कोडा, अशा जगातील सर्वात मोठे ब्रँड मराठवाड्यात आले आहेत. इतर क्षेत्रातही चांगली गुंतवणूक येत आहे. आता पाण्यासोबत सातारा व कोल्हापूर येथेही गुंतवणूक येतेय. मिहान हे देशातील आयटीमधील बिग 6 आहेत, ते सर्व मिहानमध्ये आहेत. प्रत्यक्ष रोजगार हा 1 लाख 25 हजार लोकांना मिळाला असल्याची माहिती देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.

## तिजोरीत खडखडाट असताना घोषणांचा पडला पाऊस : भास्कर जाधव

**नागपूर** : इथे सात दिवसाचे अधिवेशन पार पडले पण या अधिवेशनातून ना शेतकऱ्यांना काही मिळाले ना विदर्भातील जनतेला काही मिळाले त्यामुळे हे अधिवेशन वांझोटे ठरले अशी टीका विरोधी पक्षाने केली. अधिवेशन संपल्यावर विरोधकांची संयुक्त पत्रकार परिषद पार पडली.

या पत्रकार परिषदेत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे गटनेते भास्कर जाधव म्हणाले, निवडणुकीत सरकारी तिजोरीतून पैसे खर्च करण्यासाठी अधिवेशन झाले.सरकारकडून ज्या काही घोषणा झाल्या त्या मुंबई,ठाणे,नवी मुंबई यासाठी झाल्या पण विदर्भासाठी एकही घोषणा करण्यात आली नाही.त्यामुळे विदर्भातील जनतेची फसवणूक करणारे हे अधिवेशन होते अशी टीका भास्कर जाधव यांनी केली.

महापालिका निवडणुका डोळ्यासमोर ठेवून हे अधिवेशन झाले. सरकारवर अनेक भ्रष्टाचाराचे आरोप झाले यांबाबत प्रश्न विचारूनही सरकारने कारवाई केली नाही अशी टीका सचिन अहिर यांनी केली.

विदर्भातील धान,सोयाबीन आणि कापूस उत्पादक शेतकरी या अधिवेशनाकडे डोळे लावून बसला होता.धानाला आणि सोयाबीनला बोनस मिळावा म्हणून आम्ही मागणी केली पण सरकारने कारवाई केली नाही.राज्यातील तरुणांना. ड्रगचा विळखा आहे पण त्यावर ही कारवाईची ठोस भूमिका सरकारची नाही अशी टीका काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली. विधान परिषदेचे गटनेते सतेज पाटील म्हणाले या अधिवेशनात घोषणांचा नुसता पाऊस पडला. कापूस खरेदीचे केंद्र वाढवा ही मागणी केली पण त्याचा ही निर्णय झाला नाही. पैसे नाही खिशात पण घोषणा मात्र अपार अशी अवस्था महायुती सरकारची आहे. या सरकारने इतक्या घोषणा केल्या की त्यासाठी बजेट कमी पडेल अशी अवस्था आहे, अशी टीका काँग्रेस नेते सतेज पाटील यांनी केली.

मुख्यमंत्र्यांनी राज्यात गुंतवणूक येते, Mou झाले याबाबत सभागृहाला माहिती दिली पण ज्यांच्याबरोबर करार झाले त्या कंपन्या राज्यात येत नाही,प्रत्यक्षात गुंतवणूकच झालेली नाही त्यामुळे बेरोजगारीचा प्रश्न सुटलेला नाही अशी टीका राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जयंत पाटील यांनी केली.विरोधी पक्षाने राज्यातील कायदा सुव्यवस्था बाबत प्रश्न उपस्थित केले त्यावर ठोस उत्तर मिळाले नाही त्यामुळे सात दिवसात जनतेच्या पदरी निराशाच आली अशी टीका जयंत पाटील यांनी केली. विरोधकांनी सभागृहात आक्रमकता दाखवत प्रश्न उपस्थित केले पण सत्ताधाऱ्यांनी उत्तर दिली नाही अस शशिकांत शिंदे म्हणाले.

## मुंबईची तिजोरी लुटणारे 'रहमान डकैत' आम्ही त्यांना पाणी पाजणारे धुरंधर : एकनाथ शिंदे

**नागपूर** : "आम्ही मुंबईचे रस्ते धुतले, पण तिजोरी कधीही धुतली नाही. मात्र, काहींनी कोविड असो वा मिठी नदीचे काम, प्रत्येक ठिकाणी डल्ला मारला. ते मुंबईच्या तिजोरीवर दरोडा टाकणारे 'रहमान डकैत' आहेत, तर अशा डकैतांना पाणी पाजणारे आम्ही 'धुरंधर' आहोत," अशा शब्दांत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नाव न घेता उद्धव ठाकरेंवर टीका केली. हिवाळी अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी अंतिम आठवडा प्रस्तावावर बोलताना शिंदे यांनी विरोधकांचा खरपूस समाचार घेतला.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधान परिषदेमध्ये बोलताना, "इलाका किसी का भी हो, धमाका महायुती करेगा. हमारी सारी योजना हैं गेम चेंजर, कॉर्पोरेशन का इलेक्शन जित कर हम ही होंगे धुरंधर." या शायरीतून टोलेबाजी केली.

विरोधकांच्या टीकेला उत्तर देताना शिंदे म्हणाले, "माझे नाव घेतल्याशिवाय काहींचा दिवस उगवत नाही आणि मावळतही नाही. मी मुख्यमंत्री होतो तेव्हाही आणि आता उपमुख्यमंत्री असतानाही मला घटनाबाह्य म्हटले जाते. पण मी टीकेला टीकेने नाही, तर कामाने उत्तर देतो. लोक मला DCM म्हणतात, याचा अर्थ 'डेडिकेटेड टू कॉमन मॅन' असा आहे. सर्वसामान्य घरातील व्यक्ती पदावर बसल्याने काहींना जळजळ होत आहे."

मुंबईला महाराष्ट्रापासून तोडण्याचा डाव असल्याचा आरोप विरोधकांकडून नेहमी केला जातो. त्यावर बोलताना शिंदे यांनी स्पष्ट केले की, "सूर्य-चंद्र आले किंवा कुणाच्या सात पिढ्या खाली आल्या तरी मुंबईला महाराष्ट्रापासून कुणीही तोडू शकत नाही. उलट मुंबईबाहेर गेलेल्या मराठी माणसाला पुन्हा मुंबईत आणण्याचे काम आम्ही करत आहोत."

"मुंबईकरांसाठी बाळासाहेब ठाकरेंच्या जन्मशताब्दी दिनी 23 जानेवारी निमित्त योजना पुष्प अर्पण करणार आहोत. विधिमंडळाच्या मध्यवर्ती सभागृहात बाळासाहेबांचे तैलचित्र आम्ही लावले. मी मुख्यमंत्री झाल्यावर आयुक्तांना बोलवून निर्णय घेतला आणि आपण 300 एकरचे सेंट्रल पार्क आज करतोय. पंतप्रधान मोदींच्या जन्मदिनी आम्ही राज्यातील सर्व शहरांतील गार्डनसाठी पैसे दिले," असेही एकनाथ शिंदे म्हणाले.

यावेळी त्यांनी मुंबईतील कोस्टल रोड, पॉड टॅक्सी आणि ३०० एकरांच्या सेंट्रल पार्कसारख्या प्रकल्पांची माहिती दिली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १५ डिसेंबर २०२५


## निमसाखरचे प्रा. राहुल भोसले यांना पीएच.डी (डॉक्टरेट) पदवी



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले ) -** प्रा. राहुल भोसले यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाची (छत्रपती संभाजीनगर) पीएच.डी पदवी नुकतीच जाहीर झाली आहे. पीएच.डी ही शैक्षणिक क्षेत्रातील सर्वोच्च पदवी मानली जाते. त्यांचे शैक्षणिक परिश्रम, सातत्यपूर्ण संशोधनकार्य आणि कठोर मेहनतीला मिळालेले हे मोलाचे यश आहे. सध्या प्रा. राहुल भोसले हे महाराणा प्रतापसिंह शिक्षण संस्था संचलित, आनंदीबाई रावराणे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय वैभववाडी, सिंधुदुर्ग येथे कॉमर्स विषयाचे सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी कळंब येथील विश्वासराव रणसिंग महाविद्यालयातून पदवी (बी.कॉम) पर्यंतचे शिक्षण तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील ‘कमवा व शिका’ योजनेअंतर्गत त्यांनी वाणिज्य विभाग व संशोधन केंद्रातून पदव्युत्तर (एम.कॉम) चे शिक्षण पूर्ण केले आहे. तसेच ते जून 2012 मध्ये यू.जी.सी नेट परीक्षा देखील उत्तीर्ण आहेत. त्यांनी श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय उमरगा, धाराशिव येथील प्रोफेसर डॉ. केशव लेंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली “जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या पतपुरवठा धोरणांची अंमलबजावणी आणि अनुत्पादक मालमत्तेच्या व्यवस्थापन पद्धतीचा अभ्यास (महाराष्ट्रातील सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या विशेष संदर्भासह)” या विषयावर त्यांनी सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची वित्तपुरवठा धोरणे, त्यातील अडचणी, कर्जवाटप प्रक्रिया तसेच एन.पी.ए व्यवस्थापनातील त्रुटी आणि सुधारणा यांचा सखोल अभ्यास करून त्यांनी हा प्रबंध सादर केला. दिनांक 12 डिसेंबर 2025 रोजी आयोजित मौखिक परीक्षेमध्ये प्रमुख परीक्षक म्हणून डॉ. संदीप गायकवाड (छत्रपती संभाजीनगर) व बहिस्थ परीक्षक म्हणून डॉ. श्याम साळुंखे (जळगाव) हे ऑनलाइन माध्यमातून उपस्थित होते. संशोधनाच्या गुणवत्तेमुळे त्यांचा शोधप्रबंध मान्य करण्यात आला आणि त्यांना पीएच.डी पदवी प्रदान करण्यात आली. प्रा. राहुल भोसले यांनी मिळवलेल्या या यशाबद्दल महाराणा प्रतापसिंह शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, माजी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री श्री विनोदजी तावडे , संस्थेचे सर्व विश्वस्त, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. एन. व्ही.गवळी , उपप्राचार्य व कॉमर्स विभाग प्रमुख डॉ. एम.आय.कुंभार, कार्यालयीन अधीक्षक श्री.संजय रावराणे , महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वर्ग, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांनी त्यांचे अभिनंदन केले. प्रा. राहुल भोसले यांचा शैक्षणिक प्रवास हा धैर्य, चिकाटी आणि गुणवत्तेचे प्रतीक असून त्यांच्या पुढील संशोधन आणि शैक्षणिक कार्यासाठी सर्वांकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## डॉ. प्रियंका श्रीशैलप्पा बंदीछोडे यांचा एम. डी प्रवेश मिळाल्याबद्दल सत्कार....



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले )** : लोहारा तालुक्यातील कानेगाव येथील राजमाता अहिल्यादेवी बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने डॉ. प्रियंका श्रीशैलप्पा बंदीछोडे यांचा नुकताच सत्कार करण्यात आला. प्रियंका यांनी अभ्यासात सातत्य ठेवून एम.बी.बी.एस. चे शिक्षण नांदेड येथील शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय इथून पूर्ण केले. त्यानंतर त्या कानेगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी गट अ पदावर गेल्या चार वर्ष कार्यरत असून रुग्णांची सेवा करीत आहेत. त्यांनी अभ्यासात सातत्य ठेवून जिद्दीच्या बळावर एम. डी. मेडिसिन प्रवेश कोल्हापूर येथील राजश्री छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात झाल्याबद्दल संस्थेच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आले. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रशांत अडसुळे, लोहारा पंचायत समितीचे माजी सभापती बळीराम लव्हळे, आरोग्य सहाय्यक कागे, आरोग्य सहायिका सुपेकर, औषध निर्माण अधिकारी माळी, आरोग्य सेवक येळणे, जगताप, गायकवाड, रोडगे, गटप्रवर्तक अनिता कदम व कानेगाव येथील सर्व आशाताई उपस्थित होत्या.






## इतिहास आणि भूगोल पुस्तकापुरता मर्यादित नसावा - डॉ. संजय गायकवाड



**कन्नड (अरुण थोरात):** अजिंठा डोंगररांगेतील किल्ले अंतुर हा महत्त्वाचा गिरीदुर्ग आहे. समुद्रसपाटीपासून सुमारे 835 मीटर उंचीवर हा किल्ला वसलेला असून मराठवाडा आणि खानदेश यांना जोडणाऱ्या भौगोलिक स्थानामुळे तो इतिहासकाळात अत्यंत महत्त्वाचा ठरलेला आहे. किल्ल्याच्या उभारणीचा कालखंड, मराठा सरदार रविराव शामराव ढोणे यांच्याशी संबंधित स्थानिक परंपरा तसेच सतराव्या शतकात निजामशाहीचा वजीर मलिक अंबर याने केलेले बळकटीकरण हे महत्त्वाचे आहे. या दृष्टीने इतिहास आणि भूगोल हा केवळ पुस्तकापुरता मर्यादित नसावा, तर तो विद्यार्थ्यांच्या मनात आणि डोळ्यांत सदैव तेज निर्माण करेल, अशा पद्धतीने ऐतिहासिक आणि भौगोलिक स्थळांना भेट देणे महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन साहित्यिक तथा व्याख्याते डॉ. संजय गायकवाड यांनी केले. भराडी येथील ज्ञानविकास विद्यालयाच्या वतीने किल्ले अंतुर ता.कन्नड येथे अभ्यास सहल आयोजित करण्यात आली होती. या सहलीत प्रत्यक्ष किल्ल्यावरच या किल्ल्याचा इतिहास आणि परिसराचा भूगोल डॉ. गायकवाड यांनी विशद केला. ज्ञानविकास विद्यालयाच्या या स्तुत्य उपक्रमाची दखल घेऊन परिसरातील शाळा, महाविद्यालये आणि पर्यटकांनी आपल्या परिसरातील ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा जपावा, असे आवाहनही त्यांनी केले.किल्ल्यावरील तटबंदी, दरवाजे, खंदक, पाण्याची टाकी, बुरुज, शिलालेख, तलाव, मस्जिद, दर्गा व इतर वास्तूंचा उल्लेख करताना डॉ. गायकवाड यांनी या सर्व घटकांचे ऐतिहासिक व स्थापत्यदृष्ट्या असलेले महत्त्व स्पष्ट केले. तसेच किल्ल्याच्या आजच्या स्थितीबाबत बोलताना स्वच्छता, पर्यटकांसाठी मूलभूत सुविधा, माहिती फलक, सुरक्षित मार्गदर्शन आणि संवर्धनाच्या दृष्टीने काही आवश्यक सुधारणा करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.विद्यार्थ्यांनी किल्ल्याच्या इतिहासाविषयी उत्सुकतेने प्रश्न विचारले. इतिहास हा केवळ पुस्तकांपुरता मर्यादित न ठेवता प्रत्यक्ष स्थळभेटीतून समजून घ्यावा, असा संदेश देत डॉ. गायकवाड यांनी विद्यार्थ्यांमध्ये ऐतिहासिक वारशाबद्दल जाणीव व जबाबदारी निर्माण होणे गरजेचे असल्याचे सांगितले. भविष्यातील पिढीनेच या वारशाचे संरक्षण करायचे असल्यामुळे अशा शैक्षणिक भेटी अत्यंत महत्त्वाच्या असल्याचेही त्यांनी नमूद केले. एकूणच ही भेट विद्यार्थ्यांसाठी अभ्यासपूर्ण, प्रेरणादायी आणि अनुभवसमृद्ध ठरली. इतिहास, भूगोल, संस्कृती आणि संवर्धन यांचा समन्वय साधणारी ही शैक्षणिक उपक्रमशील भेट किल्ले अंतुरच्या ऐतिहासिक वारशाच्या जतनासाठी महत्त्वाची ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. या प्रसंगी किल्ल्याचे पहारेकरी सुनीलसिंह गौर, वनरक्षक राजेश महाजन, तसेच प्रा. ज्ञानेश्वर गर्जे आणि दत्ता मोरस्कर,श्री जाधव आर. एस., श्री सुसर. एस.एस, देशमुख डी. जी , खडोळ एस. ए, बलकार एन.बी., प्रा.ढोरमारे एन. एम, प्रा. गरुड ए.बी, श्रीमती ढोणे जे.एस, श्रीमती बी.बी.भडगे, यूवराज शेलार, शीतल शेलार, राजू घुले, कृष्णा शिंदे, विजय काकडे, जनार्धन काकडे, हर्षली जाधव, कुमारी अकोलकर, पायल वाघ, नूतन नेव्हारे, राणी खैरे, श्रीमती बावणे, ऋषिकेश चव्हाण, मोनिका देशमुख, आशा जाधवसह विद्यार्थी इतिहास प्रेमी हजर होते. उपस्थित मान्यवरांनीही विद्यार्थ्यांना किल्ल्याचे महत्त्व, वनसंवर्धन आणि पर्यावरण संरक्षणाविषयी मार्गदर्शन केले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १५ डिसेंबर २०२५


## ‘ढाई अक्षर’ राष्ट्रीय पत्रलेखन स्पर्धेतजिल्हा परिषद बहिरगावच्या विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग




**कन्नड (प्रतिनीधी)** - भारतीय टपाल विभागामार्फत आयोजित “ढाई अक्षर — राष्ट्रीय पातळीवरील पत्रलेखन स्पर्धा 2025-26” या उपक्रमात जिल्हा परिषद प्रशाला बहिरगाव, तालुका कन्नड येथील पाचवी ते दहावी वर्गातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. “माझ्या आदर्श व्यक्तीला पत्र (Letter to My Role Model)” या विषयावर तब्बल २०० विद्यार्थ्यांनी भावपूर्ण, विचारपूर्ण व सुंदर अक्षरांत पत्रलेखन केले.या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांमध्ये लेखन कौशल्य, सुसंस्कृत विचार मांडणी तसेच आदर्श व्यक्तींबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याची संधी मिळाली.

विद्यार्थ्यांनी आपल्या आई-वडिलांपासून ते शिक्षक, शास्त्रज्ञ, समाजसुधारक, सैनिक, खेळाडू अशा विविध आदर्श व्यक्तींना उद्देशून मनोगत स्वरूपात पत्रे लिहिली.हा उपक्रम शाळेतील कलाशिक्षक सलीम अत्तार यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे राबविण्यात आला. विद्यार्थ्यांना पत्रलेखनाची रचना, भाषा, स्वच्छ अक्षर, मांडणी याबाबत योग्य मार्गदर्शन करण्यात आले.

शाळेच्या वतीने सर्व पत्रे शाळेमार्फत टपाल विभागाकडे पाठविण्यात आली.अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढत असून राष्ट्रीय स्तरावर आपले लेखन पोहोचण्याची प्रेरणा मिळत आहे. शाळेच्या या उपक्रमाबद्दल पालक व ग्रामस्थांकडूनही कौतुक करण्यात येत आहे.

हा उपक्रम यशस्वीतेसाठी प्रशालेचे मुख्याध्यापक भाऊसाहेब घोलप तसेच शिक्षक दिलीप महाजन, कुलभुषण व्यवहारे, राजेंद्र शिपी, नुतन पवार , शाम खोसरे, सलिम आतार ,किरण पाटील, राधेशाम शर्मा, स्वप्नील गांगुर्डे, गणेश बल्हाळ, रविंद्र ठाकरे, किसनाबाई गोरे, सविता कुंटे यांनी सहकार्य केले

## जय भवानीच्या हंसराज जयस्वाल याची जुडो मध्ये राष्ट्रीय पातळीवर निवड



**पाटोदा (प्रतिनिधी ) :** येथिल जय भवानी महाविद्यालयाचा खूळाडू हंसराज जयस्वाल यांने जुडो राज्यस्तरीय क्रिडा स्पर्धेत सुवर्ण पदक मिळवून त्याची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.त्या बद्दल हंसराज जयस्वाल याचा महाविद्यालयात प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला.या प्रसंगी सर्व प्राध्यापक वृंद उपस्थित होते.हंसराज जयस्वाल यांनी मिळवलेल्या या यशाबद्दल त्याचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी मंत्री मा.श्री. शिवाजीरावदादा पंडित, अध्यक्ष माजी आ.अमरसिंह पंडित,सचिव,मा.श्री.जयसिंह पंडित, आ.विजयसिंह पंडित, युवा नेते मा.श्री.रणविर काका पंडित,मा.श्री. पृथ्वीदादा पंडित,श्री.अमृत डावकर सर,श्री.प्रमोद गोरकर,श्री.प्रताप हातोटे, श्री.काशीनाथ गोगुले, श्री.दिलीपराव जाधव, मार्गदर्शक प्राचार्य डॉ.विश्वास कदम, प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे,प्रा. डॉ.सुनिल जाधव, प्रा.सोमनाथ घाडगे यांनी अभिनंदन करून राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.हंसराज जयस्वाल यास क्रिडा विभागा प्रमुख प्रा.प्रविणकुमार शिलेदार यांचे अनमोल मार्गदर्शन मिळाले आहे.त्यांचे व खेळाडू हंसराज जयस्वाल यांचे सर्व स्तरातुन अभिनंदन!होत आहे.

## पोदार जंबो किड्स जिंतूर येथे ‘आनंद नगरी’ उत्साहात संपन्न!





**जिंतूर ( बी.डी.रामपूरकर) :** जिंतूर येथील विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता प्रत्यक्ष अनुभवातून व्यावहारिक ज्ञान मिळावे, या उद्देशाने जिंतूर येथील पोदार जंबो किड्समध्ये ‘Fun Fair- आनंद नगरी’ या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. शनिवार, दि. १३ डिसेंबर २०२५ रोजी जिंतूर शहरातील गुरुदेव नगर येथे हा उपक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

या फन फेअरमध्ये विद्यार्थ्यांनी पालकांच्या सहकार्याने विविध खाद्य पदार्थांचे स्टॉल्स उभारले होते. चविष्ट पदार्थांसोबतच त्यामागील तयारी, मोजमाप, विक्री, व्यवहार, स्वच्छता आणि सादरीकरण यांचा प्रत्यक्ष अनुभव विद्यार्थ्यांना मिळाला. त्यामुळे गणिती संकल्पना, सामाजिक व्यवहार, संवाद कौशल्य आणि आत्मविश्वास या सर्वांचा समन्वय साधला गेला.

कार्यक्रमाच्या निमित्ताने शाळेचे परिसर रंगीबेरंगी सजावटीने खुलून गेले होते. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद, पालकांचा उत्स्फूर्त सहभाग आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळे ‘आनंद नगरी’ खऱ्या अर्थाने साकार झाली. या उपक्रमातून शाळा,पालक व विद्यार्थी यांच्यातील सुसंवाद अधिक दृढ झाला.पालकांनीही या उपक्रमाचे कौतुक करत अशा अनुभवाधारित शिक्षणामुळे मुलांमध्ये स्वावलंबन, जबाबदारी आणि सर्जनशीलता विकसित होत असल्याचे मत व्यक्त केले. संपूर्ण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षकवृंद, कर्मचारी आणि पालकांनी मोलाचे सहकार्य केले.

कार्यक्रमाच्या शेवटी प्राचार्य आशा दराडे यांनी विद्यार्थ्यांचे व पालकांचे विशेष कौतुक करत आपले मनोगत व्यक्त केले.“आनंद नगरीसारख्या उपक्रमांतून मुलांचे शिकणे अधिक अर्थपूर्ण होते. विद्यार्थ्यांचा उत्साह, पालकांचा सक्रिय सहभाग आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळेच हा उपक्रम यशस्वी झाला. सर्व विद्यार्थी व पालकांचे मनापासून अभिनंदन.”


दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १५ डिसेंबर २०२५


# शिकणे आणि खेळणे

विद्यार्थी जीवन हा आपल्या आयुष्यातील एक सुंदर आणि महत्त्वाचा काळ आहे. आपले शरीर, मन आणि बुद्धी यांचा विकास करण्यासाठीही खूप महत्त्वाचा आहे. शाळेत आपण नवीन धडे शिकतो, लिहितो, वाचतो आणि नवनवीन गोष्टी अनुभवतो. पण फक्त अभ्यास केल्यास शरीर थकते आणि मन कंटाळते. त्यामुळे खेळ, व्यायाम आणि अभ्यास यांचा समतोल राखणे अत्यंत गरजेचे आहे. ◦ खेळ:-- खेळ हा शरीर आणि मन दोन्ही ताजेतवाने ठेवतो.- मैदानावर धावणे, खो-खो, कबड्डी, चेंडू खेळणे, बॅडमिंटन यामुळे स्नायू बळकट होतात आणि शरीर चपळ बनते.- तुमच्या आवडत्या खेळांना सुद्धा वेळ द्या.- मित्रांसोबत खेळताना आपण हसतो, मजा करतो आणि ताण दूर करतो.- जिंकताना नम्र राहायला आणि हरल्यावर पुन्हा प्रयत्न करण्याची सवय लागते. ◦ व्यायाम:-- सकाळी उठून हात-पाय हालवणे, चालणे, उड्या मारणे, ताण देणे यासारखा व्यायाम शरीर ताजेतवाने ठेवतो.- व्यायामामुळे रक्ताभिसरण सुधारते, स्नायू मजबूत होतात आणि शरीरात ऊर्जा वाढते.- व्यायाम केल्याने मन प्रसन्न राहते आणि अभ्यास करताना लक्ष केंद्रित करणे सोपे होते. ◦ अभ्यास:-- शाळेत आपण नवीन ज्ञान मिळवतो. वाचन, लेखन, गणित, विज्ञान, समाजशास्त्र यासारख्या विषयांचा अभ्यास करतो.- नियमित अभ्यास केल्यास धडे लक्षात राहतात आणि बुद्धी सुधारते.- अभ्यासामुळे विचार स्पष्ट होतात, आपण हुशार बनतो आणि आत्मविश्वास वाढतो.- खेळ, व्यायाम आणि अभ्यास यांचा समतोल- जो विद्यार्थी खेळतो आणि व्यायाम करतो, तो अभ्यासातही लक्ष देतो.- शरीर ताजेतवाने राहते आणि मेंदू चांगले काम करतो.- या तिन्ही गोष्टींचा समतोल राखल्यास आपण धैर्यवान, संयमी आणि सहनशील बनतो. ◦ सध्याचे काळ:-- आजकाल मुले मोबाईल, टीव्ही आणि संगणकावर जास्त वेळ घालवतात.- त्यामुळे खेळ, व्यायाम आणि अभ्यासासाठी वेळ कमी मिळतो, जे योग्य नाही.- रोज ठराविक वेळ खेळ, व्यायाम आणि अभ्यासासाठी ठेवणे आवश्यक आहे.विद्यार्थी जीवनात खेळ, व्यायाम आणि अभ्यास यांचा योग्य समतोल राखणे खूप महत्त्वाचे आहे. या तिन्ही गोष्टींचा योग्य वापर केल्यास आपण निरोगी, आनंदी, हुशार आणि यशस्वी बनतो. प्रत्येक विद्यार्थ्याने दिवसाचा वेळ नीट नियोजन करून खेळ करावा, व्यायाम करावा आणि अभ्यास करावा. याच मार्गाने आपले विद्यार्थी जीवन सुंदर, आरोग्यदायी आणि यशस्वी होते. त्यामुळे आपण केवळ शहाणेच होतो असे नाही, तर निरोगी आणि आनंदी देखील राहतो.




**विठ्ठल अनमुलवाड**

परभणी ९०९६०७५६३०


## वाघाचा आजार

वाघाच्या गुहेत
गर्दी झाली खूप
वाघाचा आजार पाहून
जो तो बसे गुपचूप
वाघाच्या पायाला
झाला होता फोड
माकड मनात म्हणे
चांगलीच मोडली खोड
हकीम वैद्य सारे
थकले उपचार करून
आजारपणाच्या काळजीने
वाघ गेला झुरून
शेजारच्या जंगलातून
कोल्हे डॉक्टर आले
वाघाची प्रकृती पाहून
थोडे गंभीर झाले
डॉक्टरने काढली मग
इंजेक्शन देण्यासाठी सुई
इंजेक्शन भरीत म्हणाले
मुळीच घाबरायचे नाही
इंजेक्शन पाहून
वाघाने फोडली डरकाळी
घाबरलेले कोल्हे डॉक्टर
गुहेच्या बाहेर पळी




**रवींद्र व्ही. चालीकवार**

मु.पो.ता.महागाव

जि.यवतमाळ

मो.9011559106


# शिवाजी महाविद्यालयात 'संशोधन पद्धती' विषयावर कार्यशाळा संपन्न



**कन्नड (प्रतिनिधी )** येथील शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात मराठी भाषा विभाग, अंतर्गत मराठी भाषा संशोधन केंद्र कार्यरत आहे. या केंद्रांतर्गत मराठी विषयाचे संशोधक विद्यार्थी विविध विषयावर संशोधन करत आहेत. या संशोधक विद्यार्थ्यांना संशोधनासाठी उपयुक्त संशोधन पद्धती या विषयावर कार्यशाळा संपन्न झाली.

(ता. ११ ) कन्नड सारख्या ग्रामीण भागात विद्यार्थ्यांना मराठी विषयात संशोधन (Ph.D. ) करण्याची सुविधा मराठी विभागाच्या संशोधन केंद्रात उपलब्ध झाली आहे. कन्नड तालुक्यात मराठी विषयाचे हे एकमेव संशोधन केंद्र आहे. प्राचार्य डॉ. विजय भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेचे उदघाटन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. सर्जेराव जिगे यांच्या हस्ते संपन्न झाले.

अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. भाऊसाहेब मगर होते. व्यासपीठावर डॉ. सविता वावगे, डॉ. प्रतिभा अहिरे, मराठी विभाग व संशोधन केंद्र प्रमुख डॉ. शिवाजी हुसे, डॉ. रामचंद्र झाडे यांची उपस्थिती होती. डॉ. जिगे त्यांनी संशोधन : संकल्पना , स्वरूप आणि व्याप्ती, या विषयावर संशोधक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तर डॉ. सविता वावगे यांनी ' शोध प्रबंधाची लेखन पद्धती ' या विषयावर मार्गदर्शन केले. प्रास्ताविक डॉ. शिवाजी हुसे यांनी केले तर सूत्रसंचलन करून आभार डॉ. रामचंद्र झाडे यांनी मानले. कार्यशाळेस संशोधक विद्यार्थी उपस्थित होते.

## इयत्ता बारावी पर्यंत मराठी विषय अनिवार्य करावा याबाबतचे शालेय शिक्षण मंत्र्यांना निवेदन.



**जालना (प्रा डॉ राजेंद्र सोनवणे) :** आज नागपूर जिल्हा मराठी विषय महासंघाचे अध्यक्ष प्रा. सुरेश नखाते आणि नागपूर जिल्हा कार्याध्यक्ष प्रा. सपन नेहरोत्रा यांनी शालेय शिक्षण मंत्री मा. श्री. दादाजी भुसे साहेब आणि मा. श्री पंकज भोयर साहेब यांची प्रत्यक्ष भेट घेऊन 'इयत्ता बारावी पर्यंत मराठी विषय अनिवार्य करण्यात यावा' या मुख्य मागणीसह इतर दोन तीन महत्त्वाच्या विषयाबाबतचे निवेदन देऊन मंत्री महोदयांची सकारात्मक चर्चा केली. मंत्री महोदयांनी निवेदनातील मागणी महत्त्वाची असल्याचे कबूल केले. या विषयाबाबत योग्य तो पाठपुरावा करून लवकरच निर्णय घेतला जाईल ,असे शालेय शिक्षण मंत्र्यांनी सांगितले.मराठी विषय महासंघाच्या वतीने देण्यात आलेले निवेदन सर्व मराठी भाषिकांसाठी आणि मराठी विषय शिक्षकांसाठी अतिशय महत्वाचे असून यामुळे राज्यातील मराठी विषय शिक्षकांना फायदा होणार आहे, असे मराठी विषय महासंघाचे संस्थापक राज्य अध्यक्ष प्रा. सुनील डिसले व राज्य समन्वयक प्रा.डॉ. राजेंद्र सोनवणे, आदींनी प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १५ डिसेंबर २०२५

# डिजिटल युगातील कामगाराचे स्वातंत्र्य : 'राईट टू डिस्कनेक्ट' विधेयक २०२५ चा समाजशास्त्रीय मागोवा


आजचे जग झपाट्याने बदलत आहे. डिजिटल तंत्रज्ञानाने माणसाचे जीवन अधिक सुलभ, वेगवान आणि जोडलेले गेले आहे; परंतु याच तंत्रज्ञानाने काम आणि खासगी आयुष्य यांमधील सीमारेषा पुसट केली आहे. मोबाइल फोन, लॅपटॉप, ई-मेल, व्हॉट्सअॅप, व्हिडीओ कॉल, ऑनलाईन प्लॅटफॉर्म यांमुळे कामाची वेळ आता ठराविक कार्यालयीन तासांपुरती मर्यादित राहिलेली नाही. कार्यालय बंद झाले तरी काम मनातून सुटत नाही, सुट्टी असली तरी 'ऑनलाईन' राहण्याचा दबाव कायम असतो. याच पार्श्वभूमीवर 'राईट टू डिस्कनेक्ट' बिल 2025 हे विधेयक अत्यंत महत्त्वाचे ठरते. हे विधेयक म्हणजे केवळ कर्मचाऱ्यांचा एक नवीन हक्क नाही, तर आधुनिक समाजाच्या कामकाज संस्कृतीवर पुनर्विचार करण्याची गरज अधोरेखित करणारा सामाजिक दस्तऐवज आहे 'राईट टू डिस्कनेक्ट' या संकल्पनेचा अर्थ साधा आहे की कामाचे ठराविक तास संपल्यानंतर कर्मचारी किंवा कामगार यांना कार्यालयीन ई-मेल, फोन कॉल, मेसेज, ऑनलाईन मीटिंग किंवा तत्सम डिजिटल संपर्कापासून दूर राहण्याचा अधिकार असावा. म्हणजेच, कामाच्या वेळेनंतर कर्मचारी 'ऑफलाइन' राहू शकतो आणि त्यासाठी त्याच्यावर कोणताही अप्रत्यक्ष दबाव, शिक्षा किंवा नकारात्मक मूल्यांकन होऊ नये. आजच्या काळात अनेक कर्मचारी शारीरिकदृष्ट्या कार्यालयाबाहेर असतात, पण मानसिकदृष्ट्या सतत कामाशी जोडलेले असतात. हा सततचा मानसिक ताण, उपलब्ध राहण्याची अपेक्षा आणि तत्काळ प्रतिसाद देण्याची सक्ती हळूहळू व्यक्तीच्या मानसिक आरोग्यावर, कौटुंबिक जीवनावर आणि सामाजिक नातेसंबंधांवर गंभीर परिणाम करते. त्यामुळे 'राईट टू डिस्कनेक्ट' ही केवळ कामगार कायद्याची तरतूद नसून मानसिक आरोग्य, मानवी प्रतिष्ठा आणि सामाजिक संतुलनाशी जोडलेली मागणी आहेसमाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहिल्यास कामाचे स्वरूप हे नेहमीच सामाजिक रचनेशी जोडलेले राहिले आहे. औद्योगिक क्रांतीच्या काळात कामाची वेळ, कारखान्याचे तास, कामगारांचे श्रम हे स्पष्टपणे ठरवले गेले. पुढे कार्यालयीन संस्कृती आली तेव्हा 'नऊ ते पाच' ही वेळ समाजमान्य झाली. पण डिजिटल युगात ही चौकट मोडली आहे. 'वर्क फ्रॉम होम', 'हायब्रिड वर्क', 'फ्रीलान्सिंग', 'गिग इकॉनॉमी' यांसारख्या संकल्पनांनी काम अधिक लवचिक केले असले, तरी त्याच वेळी कामगारांचे संरक्षण कमकुवत झाले आहे. कर्मचारी कधीही, कुठूनही काम करू शकतो, ही सुविधा जितकी आकर्षक आहे, तितकीच ती शोषणाची शक्यता वाढवणारी आहे. कारण कामाची वेळ ठरलेली नसल्यामुळे कामगार कायम उपलब्ध राहील, अशी अपेक्षा निर्माण होते. 'राईट टू डिस्कनेक्ट' बिल या बदलत्या कामसंस्कृतीत कामगारांचे हक्क पुन्हा ठोसपणे अधोरेखित करतेया विधेयकाचा मुख्य उद्देश म्हणजे काम आणि वैयक्तिक आयुष्य यांमधील संतुलन पुन्हा प्रस्थापित करणे. आधुनिक समाजात व्यक्तीची ओळख केवळ तिच्या कामगिरीवर ठरवली जात आहे. कामाच्या बाहेरचे आयुष्य कुटुंब, विश्रांती, आरोग्य, सामाजिक सहभाग या गोष्टी दुय्यम ठरत चालल्या आहेत. समाजशास्त्र सांगते की जेव्हा व्यक्तीचे सामाजिक आयुष्य आकुंचन पावते, तेव्हा समाजात तणाव, नैराश्य, एकटेपणा आणि मानसिक आजार वाढतात. 'राईट टू डिस्कनेक्ट' हा हक्क व्यक्तीला तिचे आयुष्य केवळ कामापुरते मर्यादित न ठेवता पूर्ण मानव म्हणून जगण्याची मुभा देतो. काम हे जीवनाचा एक भाग आहे, संपूर्ण जीवन नाही हा संदेश या विधेयकातून अधोरेखित होतो.या विधेयकात कामगार आणि नियोक्ता यांच्यातील नातेसंबंध नव्या पद्धतीने मांडलेले दिसतात. पारंपरिक अर्थाने नियोक्ता म्हणजे आदेश देणारा आणि कर्मचारी म्हणजे त्याचे पालन करणारा, अशी श्रेणीबद्ध रचना होती. परंतु आधुनिक लोकशाही समाजात कामगारांचे हक्क, प्रतिष्ठा आणि स्वायत्तता मान्य केली जाते. 'राईट टू डिस्कनेक्ट' बिल नियोक्त्यांनाही जबाबदार बनवते. कामाचे तास, आपत्कालीन परिस्थिती, डिजिटल संवादाचे नियम, कर्मचाऱ्यांच्या विश्रांतीचा कालावधी या सर्व बाबी स्पष्टपणे ठरवण्याची अपेक्षा या विधेयकातून व्यक्त होते. त्यामुळे कामाचे नियोजन अधिक शिस्तबद्ध आणि मानवीकेंद्रित होण्याची शक्यता निर्माण होतेमहिलांच्या दृष्टीने या विधेयकाचे महत्त्व अधिक आहे. भारतीय समाजात महिलांवर घरकाम, मुलांची जबाबदारी, वृद्धांची काळजी आणि नोकरी असा दुहेरी किंवा तिहेरी भार असतो. 'वर्क फ्रॉम होम'च्या काळात अनेक महिलांना कार्यालयीन काम आणि घरगुती जबाबदाऱ्या एकाच वेळी सांभाळाव्या लागल्या आहेत. कामाची ठराविक वेळ नसल्यामुळे महिलांच्या विश्रांतीचा वेळ जवळजवळ नाहीसा झाला. 'राईट टू डिस्कनेक्ट' हक्क महिलांना मानसिक मोकळीक देऊ शकतो, कारण तो कामाच्या अपेक्षा मर्यादित करतो आणि वैयक्तिक वेळेचा सन्मान करतो. समाजशास्त्रीयदृष्ट्या हा हक्क लिंगसमतेच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल ठरू शकतोतरुण पिढीसाठीही हे विधेयक तितकेच महत्त्वाचे आहे. आजची तरुणाई स्पर्धात्मक वातावरणात काम करत आहे. सतत 'ऑनलाईन' राहणे, तत्काळ प्रतिसाद देणे, जास्त वेळ काम करणे हेच यशाचे मोजमाप बनले आहे. या दबावामुळे बर्नआउट, चिंता, नैराश्य, झोपेचे विकार यांचे प्रमाण वाढत आहे. समाजशास्त्रात याला 'डिजिटल थकवा' असे म्हटले जाते. 'राईट टू डिस्कनेक्ट' बिल तरुण पिढीला हे शिकवते की स्वतःची काळजी घेणे, विश्रांती घेणे आणि कामापासून दूर राहणे हे कमजोरी नाही, तर निरोगी जीवनाचे लक्षण आहे.या विधेयकाचा प्रभाव केवळ वैयक्तिक पातळीवर मर्यादित राहत नाही, तर तो संपूर्ण समाजावर परिणाम करतो. जेव्हा कर्मचारी मानसिकदृष्ट्या तणावमुक्त असतो, तेव्हा तो अधिक सर्जनशील, उत्पादक आणि समाधानी असतो. याचा फायदा उद्योगांनाही होतो. कामगारांचे आरोग्य बिघडले, तर उत्पादकता घटते, अनुपस्थिती वाढते आणि सामाजिक आरोग्यव्यवस्थेवर ताण येतो. त्यामुळे 'राईट टू डिस्कनेक्ट' हा हक्क अर्थव्यवस्थेच्या दृष्टीनेही दीर्घकालीनदृष्ट्या फायदेशीर ठरू शकतो.समाजशास्त्रीय दृष्टीने पाहिल्यास हे विधेयक आधुनिक भांडवलशाही व्यवस्थेतील अति-उत्पादन आणि अति-काम या प्रवृत्तीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करते. सतत काम, सतत उपलब्धता आणि कार्यक्षमतेची अतिरेकी अपेक्षा ही माणसाला यंत्रासारखे वागवते. 'राईट टू डिस्कनेक्ट' ही संकल्पना माणूस केंद्रस्थानी ठेवणाऱ्या विकासाच्या विचाराशी जोडलेली आहे. विकास म्हणजे केवळ आर्थिक आकडे नव्हेत, तर मानवी सुख, आरोग्य आणि सामाजिक नातेसंबंध यांचाही समावेश असावा, ही भूमिका या विधेयकातून अधोरेखित होते.वर्तमानपत्राच्या माध्यमातून सर्वसामान्य लोकांपर्यंत या विधेयकाची माहिती पोहोचणे अत्यंत आवश्यक आहे. कारण अनेक कर्मचारी अजूनही हे मान्य करत नाहीत की कामाच्या वेळेनंतर 'नाही' म्हणणे हा त्यांचा हक्क आहे. समाजात ही जाणीव निर्माण झाली, तर कामसंस्कृतीत बदल घडू शकतो. कार्यालयीन ई-मेलला तात्काळ उत्तर देणे ही निष्ठा नसून, विश्रांतीचा सन्मान करणे ही खरी जबाबदारी आहे, असा दृष्टिकोन विकसित होणे गरजेचे आहे. 'राईट टू डिस्कनेक्ट' बिल हा बदल घडवून आणण्याचा प्रयत्न आहे.शेवटी असे म्हणता येईल की 'राईट टू डिस्कनेक्ट' बिल 2025 हे केवळ कायदेशीर तरतुदींचे संकलन नाही, तर आधुनिक समाजाला आरसा दाखवणारे विधेयक आहे. ते आपल्याला विचारायला भाग पाडते. आपण कामासाठी जगतो आहोत की जगण्यासाठी काम करतो आहोत? काम आणि आयुष्य यांच्यातील सीमारेषा पुन्हा स्पष्ट करणे, मानवी प्रतिष्ठेला प्राधान्य देणे आणि तंत्रज्ञानावर माणसाचे नियंत्रण प्रस्थापित करणे हा या विधेयकाचा गाभा आहे. समाजाने, उद्योगांनी आणि शासनाने मिळून हा विचार स्वीकारला, तरच 'राईट टू डिस्कनेक्ट' हा केवळ कायद्यातील शब्द न राहता प्रत्यक्ष जीवनातील अनुभव बनेल.



**डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
केवळ संदेशासाठी मो. 9960103582,
bagate.rajendra५@gmail.com

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १५ डिसेंबर २०२५

# दलित समूह : एका निर्णायक वळणावर




पी.जी. जोगदंड हे नाव सामाजिकशास्त्र विषयाच्या अभ्यासकांना सर्वदूर परिचित आहेत. दलित चळवळीचा अभ्यास करताना त्यांनी लिहिलेल्या पुस्तकाच्या संदर्भाशिवाय आपणाला पुढे जाता येत नाही. दलित वुमन, दलित मूव्हमेंट इन इंडिया, न्यू इकॉनोमिक पॉलिसी अँड दलित, ग्लोबलायझेशन अँड सोशल जस्टिस, ग्लोबलायझेशन अँड सोशल मूव्हमेंटस स्ट्रगल फॉर ह्यूमन सोसायटी, दलित चळवळ: सिद्धांत आणि व्यवहार यासारख्या ग्रंथाच्या निर्मिती बरोबरच विविध चर्चासत्रामध्ये शोधनिबंधवाचन तसेच राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये सहभागातून त्यांनी सातत्याने दलित प्रश्नांवर विचार मंथन केले आहे. अलीकडेच त्यांचे "दलित अॅट क्रॉसरोडस" या शीर्षकाचे इंग्रजी पुस्तक एबीडी प्रकाशनाने प्रसिद्ध केले आहे. हे पुस्तक दलित अभ्यास, सामाजिक चळवळी आणि त्यांच्या सक्षमीकरणाच्या समकालीन मुद्द्यांवर केंद्रित आहे. हे पुस्तक संशोधन, नियतकालिके आणि संपादित पुस्तकांमध्ये प्रकाशित झालेल्या १९ शोधनिबंधांचा संग्रह आहे. या पुस्तकात दलित समाजाच्या वेदना, संघर्ष, चळवळीचे टप्पे, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आणि सक्षमीकरणाच्या दिशेने झालेला प्रवास यांचे विस्तृत चित्रण केले आहे. हे शोधनिबंध अनुभवाधिष्ठित आधारावर आधारित असल्यामुळे त्यातील माहिती आणि त्याचे विश्लेषण अधिक उपयुक्त आणि समकालीन झाले आहे. दलितांनी वेळोवेळी प्रस्थापित विषम व्यवस्थेविरूद्ध कसा लढा दिला आणि त्यांना आलेला अनुभव हा या पुस्तकातील एक समान धागा आहे. हे पुस्तक दलितांनी स्वत:हून मांडलेल्या समस्यांचे सर्वसमावेशक चित्र सादर करते. किंबहुना, ते त्यांच्या स्वतःच्या चळवळीचे प्रवर्तक आहेत आणि म्हणूनच त्यांनी केलेले विरोध/आंदोलने हे प्रायोजित नव्हते. त्यांच्याद्वारे अनुभवलेल्या वंचिततेच्या विविध स्वरूपांचे हे विश्लेषण आहे. दलितांनी वर्चस्व आणि नियंत्रणाच्या संरचनेविरुद्ध लढे दिले आहेत, ज्यात त्यांना वेगवेगळ्या प्रमाणात यश आणि अपयश मिळाले आहे. दुर्दैवाने, या संघर्षांचे आणि त्यांच्या परिणामांचे सर्वसमावेशक आणि एकत्रित दस्तऐवजीकरण अद्याप झालेले नाही. या दृष्टीने, दलितांवरील साहित्याची दीर्घकाळ प्रलंबित असलेली गरज पूर्ण करणारे हे पुस्तक अगदी वेळेवर प्रसिद्ध झाले. हे पुस्तक चर्चेतील विषयांच्या सैद्धांतिक आणि अनुभवसिद्ध पैलूचे सविस्तर वर्णन करते. हे पुस्तक विविध विषयांच्या मोठ्या वाचक वर्गाला आकर्षित करेल. लेखकाच्या म्हणण्यानुसार या पुस्तकातील लेख त्यांच्या शैक्षणिक काळखंडात लिहिले आहे. यातील सर्व लेख समाजातील तुटलेला, वंचित आणि दडपलेला घटक म्हणजेच 'दलित' या विषयाभोवती केंद्रित आहेत.

पुस्तकाच्या पहिल्या भागात जागतिकीकरण आणि दलित याविषयीची चर्चा आहे. हा लेख जागतिकीकरण आणि नवीन आर्थिक धोरणे यांचा दलित समाजावर झालेल्या परिणामांचे विश्लेषण करतो. या लेखात जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा (उदा. खासगीकरण, उदारीकरण) दलितांच्या जीवनावर झालेला सकारात्मक आणि नकारात्मक परिणामाची चर्चा केली आहे. माहिती तंत्रज्ञान, सेवा क्षेत्रात संधींची उपलब्धता हे काही सकारात्मक परिणाम तर सरकारी नोकऱ्यांतील घट, संघटित क्षेत्रातील रोजगारावर परिणाम आणि सरकारी कल्याणकारी योजनांवर होणारा खर्च कमी होण्याची शक्यता हे काही नकारात्मक पैलू आहेत. दलित समाज, जो लोकसंख्येच्या सुमारे १६ टक्के आहे; त्याला जातीव्यवस्थेने शतकानुशतके वंचित ठेवले आहे. त्याची आर्थिक स्थितीही कमकुवत आहे. शिक्षण, आरोग्य, उद्योग, बँकिंग व इतर क्षेत्रांमध्ये सरकारचे नियंत्रण कमी झाल्याने, तसेच खाजगीकरण वाढल्याने, दलितांचा रोजगार व इतर बाजारपेठांवरील प्रवेश आणखी कठीण झाला आहे. उपेक्षित समूहांच्या संदर्भात केंद्र व परिघाचे मुद्दे याची चर्चा केली असून येथे जागतिकीकरणामुळे आर्थिक विषमता कशी वाढते, याचाही परामर्श घेतला आहे. केंद्र (Core) हा जागतिक अर्थव्यवस्थेचा आणि विकासाचा लाभ घेणारा गट (उदा. उच्च-जाती आणि उच्च-वर्गीय). आणि परिघ (Periphery) हा या लाभांपासून वंचित राहिलेला किंवा दुर्लक्षित झालेला गट (उदा. दलित आणि उपेक्षित समूह). जागतिकीकरणामुळे उपलब्ध संसाधने आणि संधी केंद्रात जमा होतात, ज्यामुळे परिघावरील उपेक्षित समूहांचे जीवन अधिक कठीण होते. त्याचबरोबर विषमतेचे नवे नवे प्रकार निर्माण झाले आणि श्रीमंत-गरीब यांच्यातील दरी वाढत गेली.

पुस्तकातील दुसऱ्या भागात दलित चळवळींच्या विविध पैलूंचे, त्यांच्या स्वरूपाचे आणि सामाजिक बदलात त्यांच्या भूमिकेचे समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून विश्लेषण केले आहे. शतकानुशतकांच्या शोषणामुळे महाराष्ट्रासह अनेक राज्यांत दलित चळवळी उभ्या राहिल्या. आत्मसन्मान, समानता, प्रतिष्ठा आणि ओळख या मुख्य मागण्यांभोवती आंदोलनांची घडी बसली. सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रांत दलित समाजाला बदल जाणवू लागले. दलित लेखकांनी दलित साहित्य चळवळ उभी केली. कविता, कथा, आत्मचरित्रे, नाटके या माध्यमातून त्यांनी आपल्या अनुभवांना आवाज दिला. त्यांचे लेखन हे केवळ मनोरंजनासाठी नसून प्रतिकार व संघर्ष यांची भाषा होते. तरीही, आजच्या काळात दलित चळवळीसमोर नेतृत्वाचा अभाव, जबाबदारीचा प्रश्न आणि चळवळीतील ठप्पपणा दिसतो. 'महाराष्ट्रातील दलित चळवळी: समाजशास्त्रीय दृष्टिकोन' या लेखात दलित चळवळींचा समाजशास्त्राच्या दृष्टिकोनातून परामर्श लेखकाने घेतला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखालील चळवळ आणि नंतरच्या दलित पँथर चळवळीसारख्या महत्त्वपूर्ण टप्प्यांचा अभ्यासही यात केलेला आहे. या चळवळींनी महाराष्ट्रातील जातीव्यवस्थेचे स्वरूप आणि राजकीय समीकरणे कशी बदलली, यावर लक्ष केंद्रित केले आहे. दलित चळवळ ही केवळ हक्क मिळवण्यासाठी नाही, तर संपूर्ण समाजव्यवस्थेत मूलभूत बदल घडवण्याच्या तीव्र इच्छेतून निर्माण झाली आहे, हे येथे स्पष्ट केले आहे. केवळ आर्थिक सुधारणा नव्हे, तर सामाजिक समता, आत्मसन्मान आणि जाती-भेदभावाचा अंत करणे हे मुख्य उद्दिष्ट दलित चळवळीचे आहे. दलित चळवळ: स्वरूप आणि परिणाम या शोधनिबंधात लेखकाने दलित चळवळींच्या कार्य पद्धती (उदा. सामूहिक निदर्शने, शिक्षण आणि राजकारण) आणि त्यांचे दीर्घकालीन परिणाम तपासले आहे. दलितांमध्ये शैक्षणिक जागृती, राजकीय चेतना वाढवणे आणि संवैधानिक हक्कांबद्दल जागरूकता निर्माण करणे तसेच शांततापूर्ण मार्ग विरुद्ध अधिक आक्रमक दृष्टिकोन याचीही चर्चा केली आहे. 'महाराष्ट्रातील दलितांमध्ये विरोधाची संस्कृती' या लेखात महाराष्ट्रातील दलितांनी विरोध करण्याची एक विशिष्ट संस्कृती कशी विकसित केली, याचे चित्रण केले आहे. डॉ. आंबेडकरांच्या विचारांवर आधारित सामाजिक संघटनेची शक्ती, शिक्षणाचे महत्त्व आणि साहित्य व कलेचा उपयोग (उदा. लोकनाट्य, साहित्य) करून जाती भेदभावावर, विषमतेवर आवाज उठवणे; हा विरोधाचा सांस्कृतिक पाया दलिताना सतत आणि प्रभावीपणे संघर्ष चालू ठेवण्यासाठी प्रेरित करतो. दलित चळवळीचे विश्लेषण करताना लेखकाने 'सापेक्ष वंचना सिद्धांत' (Theory of Relative Deprivation) वापरला आहे. या सिद्धांतानुसार लोकांना फक्त वास्तविक दारिद्र्यामुळे नव्हे, तर इतरांशी तुलना करताना जाणवणाऱ्या मागासलेपणामुळे संघर्षाची प्रेरणा मिळते. आज मात्र दलित चळवळ काही अडचणींचा सामना करत आहे. नव्या नेतृत्वाची कमतरता वा संकट, उत्तरदायित्वाची कमतरता आणि चळवळीत जाणवणारा ठप्पपणा (stagnation) या कारणांमुळे ही चळवळ आज सर्वसामान्य दलितांच्या प्रश्नांना प्रभावीपणे मांडू शकत नाही, अशी चिंता व्यक्त केली जाते. म्हणजेच, दलित चळवळीने जरी ऐतिहासिक कामगिरी केली असली, तरी नव्या काळात नवे धोरण, नवे नेतृत्व, नवे प्रश्न आणि नवे भाष्य आवश्यक आहे, असे लेखकाचे मत आहे.

तिसऱ्या भागात लेखकाने आरक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले आहे. संविधानात SC-ST साठी अनेक संरक्षणात्मक तरतुदी आहेत. नोकऱ्या, शिक्षण व राजकारणातील आरक्षण हे त्यातील प्रमुख आहे. ७० वर्षांत या धोरणाने अपेक्षे इतके परिणाम दिले नसले तरी, एक दलित मध्यमवर्ग उभा राहिला आहे ही एक आशादायक घटना आहे. आरक्षणामुळे काहींना नोकरी, सुरक्षितता आणि सामाजिक प्रतिष्ठा मिळाली. पण १९९१ नंतर सरकारी क्षेत्रातील नोकऱ्या कमी झाल्याने दलितांच्या रोजगाराच्या संधीही घसरल्या. तरीही, 'सक्षमीकरण' म्हणजे आत्मविश्वास, स्वावलंबन आणि हक्कांसाठी लढण्याची क्षमता ही दलित समाजात मोठ्या प्रमाणात वाढलेली दिसते. 'नोकरीतील आरक्षण: समस्या आणि तथ्ये' हा लेख भारतातील सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षणाच्या धोरणाचे सखोल विश्लेषण करतो. भारताच्या संविधानात अनुसूचित जाती (SC) आणि अनुसूचित जमाती (ST) साठी अनेक संरक्षणात्मक तरतुदी आहेत. नोकरीत, शिक्षणात आणि राजकीय प्रतिनिधित्वात त्यांना आरक्षण दिले आहे. संविधानाने दलितांच्या सामाजिक आणि शैक्षणिक विकासाची गरज स्पष्टपणे मान्य केली आहे. या विभागात (प्रकरणे ८—१५) या सर्व तरतुदींचा आणि योजनांचा सविस्तर आढावा घेतला आहे. गेल्या सात दशकांत या धोरणामुळे काही अपेक्षित (intended) आणि काही अनपेक्षित (unintended) बदल झाले. जरी अंमलबजावणी अनेकदा अपुरी किंवा कमकुवत असली, तरी दलित मध्यमवर्ग म्हणून ओळखला जाणारा एक छोटा, पण महत्त्वाचा घटक उभा राहिला आहे. म्हणूनच, आरक्षण धोरण हे दलित समाजात सामाजिक गतिशीलता घडवून आणणारे एक महत्त्वाचे साधन ठरले आहे.

आरक्षणाचे ऐतिहासिक मूळ आणि घटनात्मक आधार (Article 16 (4)) याविषयीची चर्चा करून आरक्षणाच्या अंमलबजावणीतील त्रुटी, 'क्रीमी लेयर' बाबतचे वादविवाद, आणि आरक्षणाचे फायदे खऱ्या गरजूंपर्यंत पोहोचत आहेत की नाही याबद्दलचे प्रश्न यावरील मांडणी यात केली आहे. दलित समाजाला राजकीय प्रतिनिधित्व आणि प्रशासनात सहभाग मिळवून देण्यात आरक्षणाची भूमिका किती महत्त्वाची आहे हेही स्पष्ट केले आहे. 'खासगी क्षेत्रातील आरक्षण - महाराष्ट्रातील कायदे' हा लेख खासगी उद्योगांमध्ये आरक्षण लागू करण्याच्या मागणीवर आणि त्या संदर्भात महाराष्ट्रात झालेल्या/प्रस्तावित कायद्यांवर प्रकाश टाकतो. सरकारी नोकऱ्यांची संख्या कमी होत असल्याने, दलितांना खासगी क्षेत्रातही पुरेसे प्रतिनिधित्व मिळावे यासाठी ही मागणी आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, भारतीय राज्याने सुरू केलेल्या आरक्षण आणि इतर धोरणे व कार्यक्रमांनी दलितांना सरकारी, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांमध्ये (PSUs) नोकऱ्या मिळवण्यास काही प्रमाणात मदत केली आहे. नोकऱ्यांमध्ये आरक्षणाने एका महत्त्वपूर्ण वर्गाला उत्पन्न, सुरक्षितता, माहिती, आश्रय आणि प्रतिष्ठा दिली आहे. परंतु १९९१ नंतर, म्हणजे नवीन आर्थिक सुधारणा सुरू झाल्यानंतर, दलितांच्या रोजगारात निरपेक्ष संख्या आणि प्रमाणात घट झाली आहे. याव्यतिरिक्त, 'राज्याने' दलितांना सबल करण्यासाठी मर्यादित स्वरूपात का होईना, एक महत्त्वाची भूमिका बजावली आहे. दलितांच्या संदर्भात सबलीकरण म्हणजे दुसरे काही नसून स्वतःची मदत करणे होय. थोडक्यात, सबलीकरण ही मनाची एक अवस्था आहे; ती आत्मविश्वास, स्वावलंबन आणि स्वतःच्या हक्कांसाठी व हितासाठी लढण्याचा दृढनिश्चय दर्शवते. याकडे 'क्षमता निर्माण करणे' (Capacity building) म्हणूनही पाहिले जाते. सबलीकरणावर लक्ष केंद्रित केल्यामुळे व्यक्तींमध्ये आर्थिक आणि सामाजिक क्षमता निर्माण करण्यावर नवीन भर देण्यात आला आहे. दलित मोठ्या प्रमाणात सबळ झाले आहेत, ज्यामुळे ते आता आपल्या समाजातील श्रेणीबद्ध रचना बदलण्याच्या उद्देशाने प्रत्येक आघाडीवर हक्क सांगू लागले आहेत. आता ते सामाजिक बदलाचे आणि पर्यायाने सबलीकरणाच्या प्रक्रियेचे प्रवर्तक बनले आहेत.

'आरक्षण धोरण आणि दलितांचे सक्षमीकरण' हा लेख आरक्षण धोरणाचा दलितांच्या सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक सक्षमीकरणावर झालेला परिणाम तपासतो. आरक्षणामुळे दलितांना उच्च शिक्षण आणि स्थिर नोकऱ्या मिळाल्या, ज्यामुळे त्यांच्या जीवनात सामाजिक गतिशीलता वाढली. आरक्षणामुळे आत्मसन्मान आणि राजकीय जाणीव वाढण्यास मदत झाली, जी सक्षमीकरणासाठी महत्त्वाची आहे. हा लेख सक्षमीकरणाच्या प्रक्रियेतील यश आणि मर्यादा या दोन्हींचे संतुलन दर्शवतो. आरक्षणाचे सामाजिक लाभ: सामाजिक गतिशीलता आणि 'समाजाचे उत्तरदायित्व' या प्रवृत्तीचे चित्रण यामध्ये अधोरेखित केले आहे. आरक्षणाचे फायदे मिळाल्यानंतर दलित समाजातील व्यक्तींमध्ये निर्माण होणाऱ्या सामाजिक जबाबदारीच्या भावनेचे विश्लेषण केले जाते. आरक्षणामुळे एका पिढीत झालेले वर्ग बदल आणि जीवनमानातील सुधारणा हा घटक महत्वपूर्ण असून सामाजिक परिवर्तनाचे संदर्भ यात दिसून येतात. 'परतफेड' प्रवृत्ती ('Paying-back' Tendency) अथवा आरक्षणाचा लाभ घेतलेल्या उच्च पदावरील किंवा सुशिक्षित दलितांनी आपल्या समाजाच्या गरिब बांधवांसाठी काय योगदान दिले (उदा. शैक्षणिक मदत, सामाजिक नेतृत्व) याकडे हा लेख लक्ष वेधून घेतो. यातील दलितांचा विकास: काही निरीक्षणे हा लेख स्वातंत्र्यानंतरच्या काळात दलितांच्या विकासाच्या प्रगतीचे एक सर्वसाधारण मूल्यांकन करतो. शिक्षण, आरोग्य, आर्थिक स्थिती आणि राजकीय सहभाग यासारख्या मानवी विकास निर्देशांकांच्या आधारावर दलितांच्या प्रगतीचे निरीक्षण करणे गरजेचे आहे. सामाजिक विकासाची गती अपेक्षेनुसार झाली आहे की नाही वा अजून कोणत्या क्षेत्रांत लक्ष देण्याची गरज आहे यावरही या लेखात प्रकाश टाकला आहे.

'दलितांचा सामाजिक विकास: काही प्रचलित प्रवाह' हा लेख दलितांच्या सामाजिक स्थितीत सध्या दिसत असलेल्या नवीन बदलांच्या प्रवाहांचे विश्लेषण करतो. दलित मध्यमवर्गाचा उदय, माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात दलितांचा सहभाग, आणि जातीय अस्मितेच्या नवीन राजकीय अभिव्यक्ती जागतिकीकरण आणि उदारीकरणाचा दलितांच्या सामाजिक विकासावर झालेला परिणाम. या महत्वपूर्ण विषयाची चर्चा येथे केली आहे. दुर्बल घटकांचे सक्षमीकरण हा विषय केवळ दलितांनाच नव्हे, तर भारतातील इतर दुर्बल आणि वंचित घटकांना (उदा. आदिवासी, मागासवर्गीय स्त्रिया) सक्षमीकरण करण्यासाठी आवश्यक असलेल्या धोरणांचा अभ्यास करतो. जमीन सुधारणा, कर्ज उपलब्धता, शिक्षण आणि आरोग्य सुविधांमध्ये सुधारणा यासारख्या उपायांवर चर्चा येथे केली आहे. विविध सरकारी योजनांचा या घटकांच्या सक्षमीकरणावर होणारा प्रत्यक्ष परिणाम शोधण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे. 'दलितांवरील मानवाधिकार उल्लंघने: भारतीय सामाजिक वास्तवाचे अन्वेषण' हा सर्वात गंभीर विषय असून तो दलितांवरील अत्याचार आणि मानवाधिकारांचे उल्लंघन यावर आधारित आहे. दलितांना आजही खेड्यापाड्यांमध्ये आणि शहरांमध्ये सामाजिक बहिष्कार, शारीरिक हिंसा आणि मालमत्तेच्या अधिकारापासून वंचित ठेवले जात आहे हे वास्तव आहे. अत्याचार प्रतिबंधक कायदा आणि इतर कायद्यांची अंमलबजावणी किती प्रभावीपणे होत आहे याचे गंभीर विश्लेषण येथे केले आहे. भारतीय समाजातील जातीय भेदभावाचे आणि हिंसाचाराचे मूलभूत कारणे शोधणे हे गरजेचे आहे.

शेवटच्या चार प्रकरणांमध्ये (सोळा ते एकोणविस) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जाती, धर्म आणि स्त्री प्रश्न या विषयांवर सविस्तर चर्चा केली आहे. आंबेडकर हे दलित समाजासाठीच नव्हे तर समानता आणि जातिनिर्मूलन मानणाऱ्या प्रत्येकासाठी मार्गदर्शक आहेत. ते दलितांसाठी एक प्रमुख प्रेरणास्थान असून ते आज जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त विचारवंत आहेत. त्यांच्या विचारसरणीतून दलितांनी सर्व क्षेत्रांत, सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक संघर्ष उभारला. आज आंबेडकर हे केवळ दलितांसाठीच नव्हे, तर जात विनाश आणि समतावादी समाजाची निर्मिती यावर विश्वास ठेवणाऱ्या सर्वांसाठी मार्गदर्शक शक्ती बनले आहेत. ते एक जागतिक पातळीवर मान्यता प्राप्त विचारवंत आहेत; अनेक लोकांनी आपली ओळख आणि संघर्ष त्यांच्या विचारांशी जोडली आहे. आंबेडकरांनी हिंदू सामाजिक व्यवस्था ही सामाजिक न्यायाच्या कसोटीवर तपासली ते भारतीय समाजातून जातिव्यवस्था आणि अस्पृश्यता नष्ट करून 'न्याय्य समाज' निर्माण करू इच्छित होते. ते म्हणायचे 'जात ही एक राक्षस आहे आणि जोपर्यंत या राक्षसाचा नाश होत नाही तोपर्यंत आपल्या समाजात कोणतीही सुधारणा शक्य नाही. आंबेडकरांनी जातिसंस्थेचे काही मूलभूत गुणधर्म ओळखले ते म्हणजे, जातिसंस्था ही एक प्रकारची शासनव्यवस्था आहे. ती अंतर्विवाहावर म्हणजेच स्वतःच्या जातीतच विवाह करण्यावर आधारित आहे. ती केवळ कामाचे विभाजन नसून, काम करणाऱ्यांचे जाती नुसार विभाजन आहे. विविध प्रकारची असमानता आहे, प्रत्येक जातीसाठी निश्चित नागरी, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि आर्थिक अधिकार दिलेले आहेत.जातिव्यवस्थेच्या उत्पत्ती आणि यंत्रणेबद्दल स्वतःचे विचार मांडल्यानंतर, डॉ. आंबेडकरांनी जाती नष्ट करण्यासाठी तीन उपाय सुचवले म्हणजे आंतरजातीय विवाह, आंतरजातीय भोजन आणि शास्त्र आणि वेदांच्या पावित्र्य आणि अधिकारावरील विश्वास नष्ट करणे जे जातिव्यवस्थेला धार्मिक मान्यता देतात. याखेरीज त्यांनी वंशपरंपरागत पुजारीपद रद्द करण्याचीही शिफारस केली. आंबेडकरांचे अंतिम ध्येय होते आधुनिक, समताधिष्ठित भारताची पायाभरणी करणे. जात-अस्पृश्यतेचे शतकानुशतकांचे बंधन तोडणे हे त्यांच्या जीवनाचे ऐतिहासिक मिशनच होते. चळवळीच्या शेवटच्या टप्प्यात त्यांनी बौद्ध धर्म स्वीकारला. धर्म हा सामाजिक असावा. तो नैतिकतेवर आधारित असावा. तो समानता, स्वातंत्र्य आणि बंधुतेचा संदेश देणारा असावा. त्यांना बौद्ध धर्मातील प्रज्ञा, करुणा आणि समानता हे तीन तत्त्व अत्यंत प्रिय होती. त्यांचा बौद्ध धर्म स्वीकार हा स्वाभिमान आणि मानवी प्रतिष्ठा मिळवण्यासाठीचा धार्मिक स्वरूपाचा सामाजिक-राजकीय विद्रोह होता. बौद्ध साहित्याची साधी, मानवी व करुणामय परंपरा आंबेडकरांना आकर्षित करत होती. त्यांनी म्हटले होते की, बौद्ध धर्माचे तत्त्वज्ञान वैश्विक, शाश्वत, समतावादी, तर्कनिष्ठ आणि नैतिक आहे. डॉ. आंबेडकर म्हणतात , "मी बौद्ध धर्म निवडतो कारण तो मला तीन गोष्टी एकत्र देतो. ज्या दुसऱ्या कोणत्याही धर्मात मला दिसत नाहीत. प्रज्ञा (समज/ज्ञान), करुणा (प्रेम/दया) आणि समता (समानता). यांमुळेच माणसाला चांगले आणि आनंदी जीवन जगता येते." बौद्ध धर्माची निवड ही आंबेडकरांची अत्यंत विचारपूर्वक आणि योग्य निवड होती. स्त्रीमुक्तीविषयीचे आंबेडकर यांचे विचार अत्यंत मूलगामी स्वरूपाचे आहे. त्यांचे असे मत होते की, जातीव्यवस्था हीच स्त्रियांच्या शोषणाची मुख्य कारणीभूत व्यवस्था आहे. त्यांनी दलित महिलांमध्ये आत्मसन्मान निर्माण करण्यावर भर दिला. हिंदू कोड बिलाद्वारे त्यांनी स्त्रियांचे अधिकार कायद्याने मजबूत करण्याचा प्रयत्न केला. आजही लिंगभाव समानतेच्या चर्चेत आंबेडकरांचा विचार जोडल्यास सर्व स्त्रियांच्या मुक्तीसाठी तो मोठा आधार ठरू शकतो. प्रस्तुत पुस्तक हे केवळ वर्णनात्मक नाही, तर दलित प्रश्न आणि वास्तवाचे विवेकी विश्लेषण करते. यामुळे हे पुस्तक केवळ 'वर्णनात्मक' न राहता 'स्पष्टीकरणात्मक' आणि 'सिद्धांताधारित' बनते. दलित अकॅडमीक क्षेत्रात या पुस्तकांने नवी भर घातली असून हे पुस्तक जिज्ञासू वाचकांना आणि विद्यार्थ्यांना त्यांच्या ज्ञान कक्षा रुंदावण्यास निश्चितच मदत करेल. या ग्रंथाच्या अनेक बाजू जमेच्या असल्या तरी मुद्रण पातळीवर प्रकाशकाने अधिक लक्ष द्यायला हवे होते.

**पुस्तक परिचय : प्रा. प्रियदर्शन भवरे**

**पुस्तकाचे नाव : दलित अॅट क्रॉस् रोड्स**
**लेखक : पी. जी. जोगदंड**
**प्रकाशन : एबीडी पब्लीशर्स, जयपूर /**
**मूल्य : १६४५**